**संगणकीय बिंदुनामावली प्रणालीचा शासनस्तरावर वापर करण्याच्या अनुषंगाने प्रणालीची पडताळणी करण्यासाठी समिती स्थापन करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण:- २०२३/प्र.क्र.८५/(ई-नस्ती क्र.१४२२९४८)/आरक्षण-३**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : १२ जून, २०२६.

**शासन निर्णय :-**

शासनाचे ई-गव्हर्नन्स धोरण, डिजीटल इंडिया अभियान व पेपरलेस कार्यालय संकल्पना यानुसार कार्यालयीन कामकाज अधिक कार्यक्षम, नागरिकाभिमुख, व्यक्तीनिरपेक्ष, पारदर्शक व गतिमान करण्याच्या दृष्टीने शासनस्तरावर विविध डिजिटल प्रणाली राबविण्यात येत आहेत. त्यानुसार, बिंदुनामावली तपासणीची प्रक्रिया सुलभ आणि गतिमान होण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आलेल्या संगणकीय बिंदुनामावली प्रणालीची पडताळणी करून ती अचूक व परिपूर्णरित्या तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद |
|---|---|---|
| १ | अवर सचिव, (आरक्षण-३) | अध्यक्ष |
| २ | सहायक आयुक्त, मागास वर्ग कक्ष, पुणे | सदस्य |
| ३ | सहायक आयुक्त, मागास वर्ग कक्ष, अमरावती | सदस्य |
| ४ | कक्ष अधिकारी, (आरक्षण-१) | सदस्य |
| ५ | कक्ष अधिकारी, (आरक्षण-२) | सदस्य |
| ६ | कक्ष अधिकारी, (आरक्षण-४) | सदस्य |
| ७ | कक्ष अधिकारी, (आरक्षण-५) | सदस्य |
| ८ | कक्ष अधिकारी, (आरक्षण-३) | सदस्य सचिव |

२. सदर समितीची बैठक दर आठवड्याच्या शुक्रवारी सकाळी ११ वाजता होईल. तसेच, संगणकीय बिंदुनामावली प्रणाली पडताळणीबाबतचा अहवाल समितीने दोन महिन्यात मा. सचिव (साविस) यांना सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०६१२१४२७३५९००७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUJATA SAMADHAN SHINDE

Digitally signed by SUJATA SAMADHAN SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=DE327EC80867699B7891ABD062FE533263B63C2E6B3C51EB5B815124A0D507E7, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=238BCCEE767A4CD91072AF004FFC5C61EE142EAC3BCA779BE3893B186EF89F6B, cn=SUJATA SAMADHAN SHINDE
Date: 2026.06.12 14:28:33 +05'30'

**( डॉ. सुजाता शिंदे )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.सचिव (साविस) यांचे स्वीय सहायक
३) सर्व सहायक आयुक्त, मावक.
(कोकण, पुणे, नाशिक, अमरावती, छत्रपती संभाजीनगर व नागपूर)
४) कार्यासन- आरक्षण-१, आरक्षण-२, आरक्षण-४, आरक्षण-५.
५) निवड नस्ती/कार्यासन-आरक्षण-३.